INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No. MH-659/13(N)
www.vmsindia.org

# 'स्वराज्याची धनदौलत – सांगली जिल्हयातील दुर्ग पर्यटकांचे आकर्षण'

प्रा. जी. के. पाटील

पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगांव

आज भारतातील नव्या पिढीला चाकोरीबध्द जीवनाची सवय लागली आहे त्याला मोकळा श्वास घ्यायला मिळतो तो उन्हाळयाच्या दिवसात अशा सर्व चक्रव्यवहारावरील रामबाण उपाय म्हणजे साहसी निसर्ग पर्यटन आणि दुर्गभ्रमंती यासाठी 1980 च्या सुमारास महाराष्ट्र शासनाने सुरु केले ईको टुरीझम आणि साहस टुरीझम ही कल्पना गेल्या पंधरा वर्षात खऱ्या अर्थाने रुजु लागली आहे. या निसर्ग दर्शन अथवा किल्ले पर्यटनातुन समाजाला मिळते विचारांची समृध्दी एक अनोखा दृष्टीकोन, धाडसीपणा, स्वतंत्रता आणि संवेदनशीलता एके काळी महाराष्ट्रातल्या मराठी माणसानं शिवछत्रपतीच्या नेतृत्वाखाली हिंदवी स्वराज्याचा जयघोष केला आणि उभा महाराष्ट्र छत्रपतीच्या पाठीशी उभा राहिला. याचे कारण छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्माच्या अगोदरचा 350 वर्षाचा इतिहास पाहिला, वाचला तर आजही त्या घटनाबद्ल मनात तिरस्कारता निर्माण होते. यवनीसत्ताधिशांने अन्याय आणि अत्याचाराची परिसिमा गाठली होती. देव, धर्म आणि मानव यांची स्थिती अत्यंत शोधनीय झाली होती. वास्तविक यवनी सत्ता मराठी माणसांच्या पराक्रमांवर चालल्या होत्या असे म्हटले तरी वावगे होणार नाही. आमच्यातले शुरत्व दुसऱ्यासाठी खर्ची होत होते आम्ही आमचे स्वःत्व हरवून गुलामगिरी स्विकारली होती ज्या काही हाताच्या बोटावर मोजणाऱ्या पराक्रमी सरदारांना जो सन्मान मिळत होता. तो बेगडी आणि बादशाहच्या मर्जीवरचा होता. बादशाहाची गैरसमर्जी झाली तर ज्यांन बादशाहसाठी पराक्रमाची खस्त खाल्ली त्यालाही प्रसंगानुरुप त्याच्या तलवारीच्या पात्याखाली माना घ्यावा लागत होत्या त्यांन एक तर मरण यातना किंवा मृत्यूस सामोरे जावे लागे तेंव्हा ही स्थिती बदलावी म्हणून छत्रपतीनी हिंदवी स्वराज्य उभारले.

या हिंदवी स्वराज्याचा जयघोष महाराष्ट्राच्या दऱ्या खोऱ्यात तीनशे वर्षापूर्वी छत्रपतीचा जय घोष करीत घुमला या स्वराज्याच्या मुलाधार होता डोंगरी आणि सागरी दुर्ग आज महाराष्ट्रात असलेल्या 361 हुन अधिक गड कोट किल्ले आजही ते छत्रपतीच्या प्रगल्भनितीची आणि मर्द मावळयांच्या अजोड पराक्रमाची गाथा आपणासमोर उभी करता आहेत. महाराष्ट्रातील या विविध दुर्गाचे, दुर्गम भौगोलिक स्थान आणि भक्कम रचना यातुन शिवकालीन स्थापत्य शास्त्राची विस्मयचकीत करणारी दुरदृष्टी जाणवते या ऐतिहासिक दुर्गाची भ्रमंती करणारी आजही तरुणाई त्याच्यांपासून नित्यनवी स्पूर्ती घेत असल्याचे दिसते आज इतिहास झालेल्या एकेकाळच्या या बुलंद दुर्गानीच एके काळी आमचा इतिहास घडविला होता त्याची साक्ष तेथील एक एक चिरा देत राहतो आहे.

पर्यटनासाठी प्रेरीत करतो आहे. सांगली जिल्हयातील दुर्गम दर्शनासाठी हे विहंगम दर्शन [1]आम्हास भारतावर प्रेम करण्यावर सदैव प्रीत करेल यातील काही किल्ले बेलांग, बुलंद आणि गढीवजा आहे दर दहा–दहा कोसावर एखादा तरी किल्ला आढळतोय सहज आढळत नाही तो किल्यांचा इतिहास गॅझेट नोंदी आणि त्याच स्वराज्यातल योगदान[2] हे नव्या पिढीला कळायचे असेल आणि त्यांचे जीवन समृध्द व्हायचे असेल तर त्याने पर्यटन करुन राजा शिवछत्रपतीची स्पुर्ती घ्यावी यासाठी किल्ले पर्यटन आवश्यक आज आपणाला संपुर्ण किल्यांची भ्रमंती करता येणं शक्य नाही तेव्हा किमान – सांगली जिल्हयातील किल्यांची आपण भ्रमंती करावी व या किल्ल्यावर कसे पोहचता येते, तो प्रदेश किती महत्वाचा होता त्यावेळी माणसं छत्रपतीच्या हाकेसरशी प्राणावर बेतणाऱ्या संकटाना सलाम घालीत कशी लढत असतील त्याची महती कळेल आणि आपणाला राष्ट्र रक्षणासाठी प्रोत्साहन मिळेल या किल्ल्यांचे महत्व सांगतांना रामचंद्रपंत अमात्य लिहतात, 'संपुर्ण राज्यांचे सार तो दुर्ग (किल्लेद्ध दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय, प्रभाभग्न होऊन देश उध्वस्त होता, देश उध्वस्त झाल्यावर राज्य कोणास म्हणावे या करिता पूर्वी जे.जे. राजे झाले त्यांनी आधी देशांसाठी दुर्गबांधून तो तो देश शाश्वत करुन घेतात आणि आले परचक्र संकट दुर्गाश्रयावर परिहार केले [3]शिवकालीन किल्ले म्हणजे प्राणरक्षण ही भावना सर्वत्र होती म्हणुनच छत्रपतीनी किल्ले बांधताना

घेतलेला किल्ला स्वराज्याबाहेर जाणार नाही याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले सांगली जिल्हयातील बाणूरगड हा दख्खन महाराष्ट्राची संरक्षक भिंत होता तो स्वराज्यासाठी छातीची ढाल करणारा गड म्हणून त्याचे स्थान महत आहे याशिवाय कोलदुर्ग, मिरज किल्ला प्रचतिगड, मच्छिंद्रगड , विलासगड (मल्लीकार्जुनद्ध हे किल्लो होत.

1द्ध मिरजेचा किल्ला – (बलाढय लष्करी केंद्र) :– 27 बुरुज, चारी बाजुनी खंदक तीन मोठे दरवाजे असणारा हा किल्ला शिलाहारांच्या ताब्यातून 1489 ला बहामनी राजवटीकडे आला. एका ताम्रपटानुसार हा किल्ला बांधताना एका व्यक्तीचा बळी दिला गेला होता दुसरा महम्मद बहामनीने हा किल्ला अभेदय असा केला या किल्ल्याने बहामनी, अदिलशाही, मोगल मराठे सत्ता अनुभवल्या[4]

किल्ल्याची रचना :–

हा जमिनीवर किल्ला असून किल्ल्याच्या सभोवती चहोबाजुनी खंदक होते त्यात पूर्वी पाणी भरलेले असे. तटबंदी दगडामातीची असून अतिशय मजबुत आणि रुंद होती तोफगोळयांनी फक्त तात्पुरता खळगा पडण्यापाडीकडे नुकसान होत नव्हते चॉद बुरुजा' हा सर्वात उंच होता. प्रत्येक अमावस्येनंतर चॉद दर्शन झाल्यावर तेथुन तोफांचे बार होत. या भुईकोट किल्ल्यात तीन दरवाजे होते. मुख्य दरवाजा पूर्वाभिमुख विजापरू दरवाजा उत्तरेकडे बंका दरवाजा दक्षिणेस म्हैशाळ दरवाजा पूर्वेकडे जिभी चौकी मोठा खंदक होता. रोज संध्याकाळी रात्री नऊ वाजता चौघडा, मशालीची राजगस्त होत असे. मुख्य दरवाजा दिंडी दरवाजा पहाटे चारला घंटा झाल्यानंतर उघडण्यात येई. त्याला घाटग्रस्त म्हणत. या किल्ल्यात प्रशाकीय वास्तू मंदिरे, मशिद, विहीरी सुबक लाकडी काम होते. औरंगजेब, छत्रपती शिवाजी महाराज, नेताजी पालकरांना, राघोबादादा या किल्ल्याने झुंजवले. 1739 ला शाहू महाराजांनी मोगलांकडून जिंकून तो डुबल सरदारांच्याकडे . 1761 ला गोविंद हरी पटवर्धन यांच्याकडे आला. सध्या या किल्ल्यात शासकीय कार्यालये असून फक्त चार बुरुज शिल्लक आहेत.

2) मराठयाचे टेहळणी केंद्र किल्ले बाणूरगड :– छत्रपतीच्या स्वराज्याला ज्या सहयाद्रीने मानवंदना दिली. मराठयांचे टेहळणीकेंद्र तो डोंगरी किल्ला म्हणजे बाणूरगड. सांगली जिल्हयातील खानापूर, आटपाडी, सोलापूर जिल्हयातील सांगोला तालुका यांच्या सिमेवर हा किल्ला असून शंभू महादेवाच्या डोंगररांगात सिताबाईच्या डोंगरातून निघालेल्या महिमान गडाच्या फाटयावर स्थानापन्न झाला आहे. भूपालसिंह राजाने तो बांधला असावा त्यावरून त्यास भूपालगड असेही म्हणतात. स्वराज्यात आल्यानंतर तो बाणूर गावी असल्याने त्यास बाणूरगड नाव पडले. समुद्र सपाटीपासून 500 मीटर उंच असून पूर्व, पश्चिम, दक्षिण बाजूंनी मजबुत तटबंदी आहे. उत्तरेकडे जंगल बारा बुरूज, बारा कमानी होत्या. किल्लेदार म्हणून फिरंगोजी नरसाळा व सबनीस म्हणून विठ्ठलपंत भालेराव काम पाहत 'मराठयांचे टेहळणी केंद्रं व शस्त्रागार होते[5] येथून माणदेश, विजापूरी आदिलशाही, निजामशाहीतील परांडा प्रदेशापर्यंत देखरेख ठेवता येते असे. येथे 2 एप्रिल 1689 इतिहासप्रसिध्द लढाई झाली ती म्हणजे छ.संभाजी महाराज दिलेरखानास जाऊन मिळाल्यानंतर त्यांनी ही संयुक्त मोहिम काढली. फिरंगोजी नरसाळा यांनी पंधरा दिवस किल्ला लढविला. उत्तरेचा बुरूज ढासळला. त्यानंतर किल्ला फिरंगोजीनी संभाजी महाराजांना 17 एप्रिल 1679ला दिला. येथे बहिर्जी नाईक यांची समाधी आहे. बाणूरगडावर हेरगिरी करीत असताना हा वीर शत्रुच्या ताब्यात सापडला. शंभू महादेवाचे किल्ल्यात मंदीर आहे. तेथे त्याने प्राण सोडले. सध्या तेथे बहिर्जी नाईक यांची समाधी आहे. या किल्ल्याकडे जाण्यासाठी पुणे–सातारा, कराड–विटा ते बाणूरगड 324 किमी व कोल्हापूर सांगली, तासगांव भिवघाट मार्गे पळशी बाणूरगड 55 किमीचा मार्ग आहे.

3) मच्छिंद्रगड शिवरायांनी बांधलेला किल्ला– 1676 ला स्वराज्यास बळकटी आणण्याकरीता म्हणून छत्रपतींना सहयाद्री किल्ल्यांची जी दुर्गशृंखला बांधली त्यापैकी हा शेवटचा किल्ला. समुद्रसपाटीपासून 791कि.मी. उंचीवर असलेला, काळभैरवाच्या डोंगराशेजारी एका वाटोळया टेकडीवर उभा आहे. या गडाच्या पूर्व बाजूच्या बुरूजाच्या खालच्या बाजूस राममंदीर आहे. तसेच एका लेणे मंदिर ही आहे. थोडे पुढे गेल्यानंतर डाव्या छतास काळया कातालात बांधलेला पाण्याचा देखणा कुंड आहे. तर उत्तर टोकावर गोरखनाथ मंदिर आहे. या गडाकडे जाताना आपणास बहेचा मारूती व कोळे नृसिंहपूर पहाता येतात. सध्या हा किल्ला मच्छिंद्रनाथाच्या मंदिरामुळे प्रसिध्द आहे.[6] या किल्ल्याकडे एसटीने इस्लामपूराहून जाता येते. अवघ्या 10 कि.मी. वरती हा किल्ला आहे. 1693 मध्ये हा गड मोगलांनी जिंकून तेथे देवीसिंग

किल्लेदाराची नियुक्ती केली. 12 नोव्हेंबर 1693 ला खुद्द औरंगजेबने किल्ल्यावर चाल केली. तेव्हा देवीसिंगने तो किल्ला देऊन टाकला. पुढे हा किल्ला 1707 मध्ये मराठयांनी जिंकला. 1818 पर्यंत पेशव्यांचे सेनापती बापू गोखले यांच्याकडे तो होता. नंतर कर्नल हेविट यांनी तो जिंकला. यावरून या किल्ल्याचे महत्व लक्षात येईल.

4) चांदोली राष्ट्रीय उद्यानातील दुर्गम दुर्ग प्रचितगड –सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी या जिल्हयांच्या सिमा जेथे एकत्र येतात त्याठिकाणी हा किल्ला उभा असून समुद्रसपाटीपासून 971 मीटर उंचीवर आहे. या किल्ल्यांच्या तिन्ही बाजू तासलेल्या कडयाप्रमाणे असून उत्तरेकडील बाजू सहयाद्रीच्या मुख्य रांगेला चिकटलेली आहे. त्यामुळे दरीत उतरणाऱ्या बिकट वाटेने कसरत करीत प्रचितगडचा सर्वोच्च माथा गाठावा लागतो. प्रचंड उंचीचे वृक्ष, शेकडो जातीचे पशुपक्षी जंगलातील कित्येक कि.मी.ची वाटप तुडविल्यानंतर आपणास प्रचितगडास जाता येते. या किल्ल्यावर जाण्यासाठी एकुण सहा मार्ग असुन नायरी ते तिवरे घाटमार्ग, मोरगिरी ते कंधारडोह रूंधीव मार्गे गडावर, मलकापूर ते चांदेल आणि सहावा देवरूख कुंडी चांदेल रूंधीमार्गे गडावर जाता येते. वारणा नदीवर चांदोली धरण असून तेथे राष्ट्रीय उद्यान बघण्यासारखे आहे. या गडावरून एकाच वेळी कोकण, सातारा, कोल्हापूराकडील शत्रुच्या हालचालीवर लक्ष ठेवता येत असे. याचा टेहळणी केंद्र म्हणूनही वापर होत असावा.[7] त्यांचे दुसरे नाव उचितगड आहे. सुर्यराव शिर्केचा पराभव करुन 29 एप्रिल 1961 ला महाराजानी शृगांरपूर जिंकले व प्रचितीगड स्वराज्यात आला कर्नाटक मोहिमेच्या वेळी छत्रपतीने संभाजीस तेथे ठेवले होते. 1918 ला कर्नल प्रॉर्थरने प्रचितीगडाचा ताबा घेतला सांगली जिल्हयातील यानंतरचा अत्यंत दुर्लक्षित असलेला सद्यस्थितीतील कोळदुर्ग असुन विटा – जत रस्त्यावर विजापूर – गुहागर हायवेवर पळशी गावापासून 3 कि.मी अंतरावर हा किल्ला आहे. या परिसरातील लोक त्याला कुळदुर्ग म्हणतात. सध्या या किल्ल्यावर तटबंदी बुरुज अत्यंत पडित अवस्थेत शिल्लक आहेत. मात्र या किल्ल्यावर तद्कालात सुंदर कलाकुसरीची मंदीरे असावी, येथे इतत्थता पडलेल्या दगडावरुन असे दिसते हा किल्ला बाणुरगड जवळ असून एक संरक्षक, टेहळीचा किल्ला म्हणून बाणुरगडा बरोबरच त्याचा पर्यायी किल्ला म्हणून वापर होत असावा. सांगली – मिरज नागज मार्गे खानापूर रस्त्यावर येवून या किल्ल्याकडे जाता येते याच रस्त्याच्यापुढे शुकाचार्याचे मंदीर आहे.

एकूणच पाहता सांगली जिल्हयातील वरील पर्यटन स्थळे लक्षात घेता आपणास असे लक्षात येईल की, छत्रपतीनी दख्खन पठारावरील प्रदेशाचे, रयतेचे, स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी किल्ले बाणुरगड व किल्ले प्रचितगड यांचे उपयोग टेहळणी केंद्र म्हणून केला होता दक्षिण कोकण ते विजापूरची अदिलशाही, पराडयांपर्यत निजामशाही व मोगलीं सत्तेवर वचक ठेवणारा सांगली जिल्हयातील हा भूभाग व किल्ले हे स्वराज्याची धनदौलत होती. या परिसरातून काही आंतरराजीय व्यापारी मार्गही (विजापूर, वाई) जात होते आज 21 व्या शतकात हा रस्ता गुहागर–विजापूर राष्ट्रीय महामार्ग म्हणून तयार केला जात आहे. अशा या स्वराज्याच्या धनदौलतीचे छत्रपती स्वामी होते भटकंतीच्या माध्यमातुन या किल्ल्यांना भेटी देताना छत्रपतीच्या पदस्पर्शाने पूनीत झालेल्या या मातीच्या कपाळाचा गंध आपल्या भाळी लावता येईल या दृष्टीने या किल्ल्यांचे पर्यटन सफर तरुणांनी करावे व शासनाने या पर्यटन स्थळाचे पुरातत्व खात्याच्या माध्यमातुन संरक्षण करावे.

संदर्भ :–

1) महाराष्ट्र देशा – उध्दव ठाकरे – प्रबोधन प्रकाशन मुंबई – मे 2010 मुल्य–100 रुपये पान नं 11

2) भटकंती – वर्षा सत्पाळकर – मैत्रेय मास कम्युनिकेशन मुंबई जुलै 2007 मुल्य 15 रु. पान नं 51

3) मराठी सत्तेचा उदय – डॉ जयसिंगराव पवार पृथ्वी पब्लिकेशन कोल्हापूर जून 2003 मुल्य 150रु. पानं न 345

4) आभाळ माया – प्रा. वैज्यनाथ महाजन सुनील प्रिटेन्स सांगली ऑक्टोंबर 2016 मुल्य 88 रु. पान 20

5) दुर्गसंपदा महाराष्ट्राची – भगवान चिले – शिवस्पर्श प्रकाशन 19 फेब्रुवारी 2013 मुल्य 150 रु. पान नं 35

6) ।। ।। कित्ता 2 पान 31

7) ।। ।। कित्ता 3 पान 41